Registered - R.N.I. No.: MAHMAR/2008/26837 • Postal Regd. No.: MCN/110/2018-2020 • Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, GPO, Mumbai on 12th & 13th of every month.

सप्टेंबर २०१९

खंड १२, अंक ९

किंमत रु. २/-

वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायझर्स प्रायव्हेट लिमिटेड यांचे मासिक

वेल्थवाईज®

Wiseinvest®
With YOU, in meeting
FINANCIAL CHALLENGES

आतील बाजूस — पान क्र.

निवृत्तीनंतरच्या जीवनासाठी तुम्ही जे नियोजन करताय ते पुरेसे आहे का? — २

निवडक फंडचा परिणाम — ३

वेळ आली आहे, वित्तीय नियोजनाची कास धरण्याची — ४

"वाईजइन्व्हेस्ट"

"वेल्थवाईज" हे वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायझर्स चे मासिक प्रकाशन आहे. वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायझर्स म्युच्युअल फंडस् चा विशेष व्यासंग असलेली उत्तम सल्लागार कंपनी आहे. जरी म्युच्युअल फंडस् हा पैसा गुंतवण्याचा सोपा मार्ग असला तरी व्यावसायिक सल्ला मिळाला तरच तुम्हाला सर्वोत्तम प्राप्ती होईल. आमचे सीईओ श्री. हेमंत रूस्तगी हे सुप्रसिध्द पर्सनल फायनान्स तज्ञ आहेत. त्यांच्याकडे म्युच्युअल फंड उद्योग क्षेत्रातला 25 वर्षांपेक्षा अधिक अनुभव आहे. ते नियमितपणे मुख्य राष्ट्रीय दैनिकांतून आणि व्यापारविषयक मासिकांतून लेख लिहितात त्याचप्रमाणे गुंतवणुकीशी संबंधित दूरदर्शनवरच्या अनेक कार्यक्रमांतून पर्सनल फायनान्स तज्ञ म्हणून उपस्थित असतात. त्या खेरीज, म्युच्युअल फंड उद्योगात अनेक वर्षे व्यतीत केलेल्या व्यावसायिकांचा समावेश आमच्या सल्लागारांच्या फळीत आहे. गेल्या तेरा वर्षांत आमच्या हजारो ग्राहकांना आमच्या उत्तम सल्ल्याचा लाभ झालेला आहे आणि त्यांनी त्यांच्या पोर्टफोलिओचा म्युच्युअल फंडस् हा मुख्य आधार बनवलेला आहे. तुमच्या सध्याच्या तसेच नवीन गुंतवणुकीसाठी तुम्हाला सुध्दा आमच्या तज्ञ मार्गदर्शनाचा लाभ होऊ शकतो. तुम्हाला फक्त आमच्या कोणत्याही शाखेला फोन करणे अथवा information@wiseinvestadvisors.com या संकेतस्थळावर तुमचे तपशील ई–मेल करणे एवढेच करायचे आहे आणि आमचे व्यावसायिक सल्लागार उरलेले सर्व काही करतील.

प्रिय गुंतवणूकदार,

अर्थव्यवस्थेच्या वृद्धीला चालना देण्यासाठी अर्थमंत्र्यांनी २३ ऑगस्ट २०१९ रोजी अनेक उपाययोजना घोषित केल्या. एफपीआयज्साठी अत्यंत आवश्यक असलेला दिलासा म्हणून, सरकारने परदेशी गुंतवणूकदारांवरील वाढलेला अधिभार मागे घेतला. अँजेल टॅक्स, बँकांचे पुनर्भांडवलीकरण आणि इनकम टॅक्स नोटिसेस यांच्याशी संबंधित असलेल्या इतर अनेक उपाययोजनांसहीत हे केले गेले. त्याशिवाय, असे घोषित करण्यात आले की, बँकांच्या पुनर्भांडवलीकरणासाठी ७०,००० कोटी रुपयांचा अर्थसंकल्प लगेचच लागू करण्यात येईल.

मोटार उद्योगासाठी (ऑटो सेक्टर), ३१ मार्च २०२० पर्यंत खरेदी करण्यात आलेल्या वाहनांसाठी घसारा दुप्पट करून तो ३० टक्के करण्यात आलेला आहे आणि सरकारी खात्यांवर वाहन खरेदीसाठी घालण्यात आलेली बंदी उठविण्यात आलेली आहे. खप वाढविण्यासाठी, बँकांनी व्याजदर कमी करण्याचा निर्णय घेतलेला आहे, ज्यामुळे गृहकर्ज, वाहनकर्ज आणि इतर कर्जांचे मासिक हप्ते कमी होणार आहेत. यानंतर सरकारने कोळसा खाणींमध्ये आणि कॉंट्रॅक्ट मॅन्युफॅक्चरिंगमध्ये १०० टक्के परदेशी गुंतवणुकीला परवानगी देण्याचा निर्णय घेतला, ज्यामुळे सिंगल-ब्रँड रिटेलर्ससाठी सोर्सिंग नॉर्मस् आणि डिजिटल मीडियात २६ टक्के परदेशी गुंतवणूक सोपी झाली.

अर्थमंत्र्यांनी सार्वजनिक क्षेत्रांतील बँकाच्या महाविलिनीकरणाचीही योजना जाहीर केली, ज्यात ५ ट्रिलिअन अमेरिकन डॉलरचे उद्दिष्ट गाठण्याच्या हेतूने बँकिंग क्षेत्राला नवसंजीवनी देण्यासाठी आणि पुनरुज्जीवित करण्यासाठी १० बँकाचे ४ बँकांमध्ये विलिनीकरण करण्यात आले. ह्या विलिनीकरणामुळे देशातील सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची एकूण संख्या २७ वरून १२ वर येईल.

एकीकडे ह्या सकारात्मक उपाययोजनांतून हे दिसून येते की, अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी देण्यासाठी सरकार प्रतिसाद देत आहे, तर दुसरीकडे असे दिसून येते की, अर्थव्यवस्थेतील मंदी अजूनच वाढलेली आहे. भारताची ढोबळ देशांतर्गत उत्पादनवृद्धी मार्चच्या तिमाहीतील ५.८%च्या तुलनेत जूनच्या तिमाहीत गेल्या सहा वर्षांतील सर्वात कमी म्हणजेच ५% पर्यंत घसरली. वस्तुनिर्माण क्षेत्राची वृद्धी, २०१८-१९च्या पहिल्या तिमाहीच्या १२.१%च्या तुलनेत, जूनच्या तिमाहीत जवळपास ०.६% एवढी कोसळलेली आहे.

बाजारातील मूल्यांकन दीर्घकालीन सरासरीच्या आसपास आहे. खरे म्हणजे, अनेक सेक्टर्स आणि स्टॉक्स त्यांच्या दीर्घकालीन मूल्यांकनाच्या पटीच्या खालच्या पातळीत ट्रेडिंग करीत आहेत. व्याजदर घसरत आहेत, ह्याचा विचार करून रोकडसुलभता वाढत आहे, तेलाच्या किमती स्थिर आहेत आणि अर्थव्यवस्थेला उभारी देण्यासाठी अर्थमंत्र्यांकडून अधिक घोषणांची अपेक्षा आहे, चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या सहामाहीत बाजारपेठेत सुधारणा होईल अशी आम्हाला आशा वाटते.

सस्नेह,

हेमंत रुस्तगी
संपादक

Address to be affixed here

If undelivered, please return to:

Wiseinvest Advisors Pvt. Ltd.
602, 6th Floor, Sri Krishna Complex,
Opposite Laxmi Industrial Estate,
New Link Road, Andheri (W),
Mumbai 400 053.
Tel : 2673 2671 / 2673 2676

ऑगस्ट २०१९ मधील शेअर बाजारातील परिणाम

निर्देशांक	०१ ऑगस्ट २०१९	३० ऑगस्ट २०१९	बदल (%)
सेन्सेक्स	३७,०१८.३२	३७,३३२.७९	०.८५
मिडकॅप	१३,५२६.५२	१३,४६७.५५	-०.४४
स्मॉल कॅप	१२,५५१.९४	१२,५३४.७०	-०.१४
बी एस ई-१००	११,०७७.३३	११,१३९.७८	०.५६
बी एस ई-२००	४,५७८.९३	४,६०९.०५	०.६६
बी एस ई-५००	१४,१५२.७४	१४,२३४.०७	०.५७

निवृत्तीनंतरच्या जीवनासाठी तुम्ही जे नियोजन करताय ते पुरेसे आहे का?

आपल्या सर्वांना शांतपणे निवृत्त व्हायचे असते. परंतु आपल्यातील बरेच जण त्याचे नियोजन करीत नाही. खरे म्हणजे निवृत्तीसाठी निधी जमा करणे ही एकच गोष्ट बरेच जण करतात, ज्यामुळे त्यांना आजच्या जीवनशैलीशी तडजोडी कराव्या लागण्याची शक्यता असते. अनेक जण निवृत्तीसाठी गुंतवणूक करणे पुढे ढकलीत असतात, कारण त्यांना वाटते की यासाठी त्यांच्याकडे अजून वेळ शिल्लक आहे. म्हणून बरेचजण मोठा निधी गोळा करण्याच्या भावनेने भारून जातात. त्यामुळे नियमितपणे मोठी रक्कम गुंतवण्याची क्षमता असूनही ते गुंतवणूक करायला सुरुवात करीत नाहीत, कारण त्यांना वाटत असते की ह्या उद्देशासाठी गुंतवणूक करण्यासाठी त्यांच्याकडे मोठी रक्कम असायला हवी. त्याचप्रमाणे, अशीही उदाहरणे आहेत की, जेथे गुंतवणूकदार अल्प आणि मध्यम मुदतीच्या लक्ष्यांना प्राधान्य देतात आणि त्याच्या बदल्यात त्याच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाच्या टप्प्यांवरील गरजांकडे दुर्लक्ष करण्याची चूक करतात.

म्हणून वादाचा प्रश्न असा आहे की, आरामदायी निवृत्तीसाठी एखाद्याने कशा प्रकारे नियोजन करावे? ह्याचे उत्तर असे आहे की, खरे म्हणजे तुम्ही लहान वयातच जरी छोट्या-छोट्या रकमा गुंतवायला सुरुवात केली आणि निवृत्तीपर्यंत ही प्रक्रिया अखंडपणे चालू ठेवली, तरी उत्तम परतावा आणि कंपाऊंडिंगची शक्ती यामुळे छान परिणाम प्राप्त होऊ शकतात. संकलन करीत असताना, त्यातून पैसे काढून न घेणे हे महत्त्वाचे असते. आर्थिक अडचणीच्या काळात तुम्हाला मदत व्हावी म्हणून आणीबाणीच्या प्रसंगी उपयोगी पडेल असा निधी उभारून तुम्ही हे टाळू शकता.

एकीकडे लवकर गुंतवणूक करणे महत्त्वाचे असते, तर दुसरीकडे तुम्ही योग्य असेट क्लासची निवड करून शिस्तबद्ध गुंतवणूक धोरणाचा अवलंब केला पाहिजे. दुर्दैवाने अनेक गुंतवणूकदार, विशेषत: ज्यांना निवृत्तीवेतनाची सुविधा नसते ते त्यांच्या गुंतवणूक प्रक्रियेत ह्या बाबतीत चूक करतात. त्यांना असे वाटत असते की, पीपीएफ, पीएफ, ग्रॅच्युईटी आणि मुदतठेव यांच्या माध्यमातून त्यांच्याकडे जमा होणारी एकूण रक्कम त्यांच्या निवृत्तीनंतरच्या वर्षांसाठी पुरेशी असेल आणि त्याच्या पुढील पर्यायांचा विचार करायला ते नकार देतात. हे स्पष्ट दिसते की, ते त्यांच्या खर्चावरील तेजीच्या परिणामांकडे पुरेसे लक्ष देत नाहीत आणि त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी नियमित पुरेसे उत्पन्न तयार करण्यासाठी झगडतात.

अर्थात, अशीही भावना असते की, त्यात जरी चूक झाली किंवा कमतरता भासली, तरी त्यांची मुले त्यासाठी तरतूद करतील. ही जरी आईवडीलांची नैसर्गिक भावना असली, तरी पुरेसे पैसे हाती नसणे म्हणजे तुमच्या आयुष्यातील महत्त्वाच्या वर्षांमध्ये तुमच्या प्रतिष्ठेशी आणि गरजांशी तडजोड करणे असा त्याचा अर्थ होईल. हे सिद्ध झालेले आहे की, तुम्हाला पैशाच्या बाबतीत स्मार्ट हालचाली केल्या पाहिजेत, ज्यात अंदाजपत्रक तयार करणे आणि त्याचबरोबर पारंपरिक गुंतवणूक इन्स्ट्रुमेंट्सच्या पलीकडे पाहणे आणि म्युच्युअल फंडांनी ऑफर केलेली मार्केट लिंक्ड प्रॉडक्ट्स आपलीशी करणे ह्याचा समावेश होतो. ह्यामुळे तुम्हाला बचत करण्याची तसेच अधिक पैसे साठवून परताव्याचा सकारात्मक वास्तव दर प्राप्त करण्याची संधी प्राप्त होईल, म्हणजेच ढोबळ परतावा वजा कर आणि तेजी.

ज्यांनी लवकर गुंतवणूक करायला सुरुवात केलेली असेल त्यांच्यासाठी इक्विटी फंड हा त्यांच्या पोर्टफोलिओतील महत्त्वाचा भाग असला पाहिजे. तुम्ही जर कराची बचत आणि निवृत्तीसाठी पैसे जमा करणे ह्या दोन बाबींचा संयुक्तपणे विचार करीत असलात, तर त्यासाठी रिटायरमेंट फंड्स आणि इक्विटी-लिंक्ड टॅक्स सेव्हिंग्ज स्कीम्स (ELSS) सारखे पर्याय आहेत. एनपीएसमध्ये गुंतवणूक करण्याचा पर्यायही उपलब्ध असतो. जर कराची बचत हा विचार नसेल, तर उत्तम वैविध्य असलेल्या प्लेन-व्हॅनिला इक्विटी फंड्सचा विचार केला जाऊ शकतो. ज्यांच्यासाठी प्युअर इक्विटी फंडमध्ये आवश्यक असलेले दीर्घकालीन होरायझन उपलब्ध नसते, त्यांच्यासाठी इक्विटी आणि डेट यांमध्ये वेगवेगळ्या प्रमाणात संयुक्तपणे गुंतवणूक करणारे हायब्रीड फंड्स हाही चांगला पर्याय असू शकतो.

मार्केट-लिंक्ड प्रॉडक्ट्समध्ये गुंतवणूक करण्याशी काही जोखमा जोडलेल्या असतात ह्यात काही शंका नाही, पण तुमच्या उद्दिष्टांवर आधारित गुंतवणूक दृष्टिकोनावर आधारित असेट ॲलोकेशन धोरणाने आणि शिस्तबद्ध पद्धतीने गुंतवणूक करून त्या कमी केल्या जाऊ शकतात. एकदा तुम्ही तुमच्या निवृत्तीच्या वयाच्या आसपास पोहोचलात की, उत्पन्न निर्माण करण्यासाठी तसेच निवृत्तीनंतर काही प्रमाणात वृद्धी प्राप्त करण्यासाठी तुमच्या पोर्टफोलिओचे पुन्हा एकदा संतुलन करण्याची गरज असते. सातत्यपूर्ण आणि कराची बचत करणाऱ्या मार्गाने नियमित उत्पन्न निर्माण करण्यासाठी सिस्टीमॅटिक विथड्रॉवल प्लॅन (SWP) हा एक उत्तम पर्याय असू शकतो. हे महत्त्वाचे असू शकते कारण त्यांची गुंतवणूक मार्केट लिंक्ड प्रॉडक्ट्समध्ये केली जात असली, तरीही दरमहा विशिष्ट उत्पन्न प्राप्त करण्यातील अनिश्चितता त्यामुळे दूर होते. लक्षात ठेवा, तुम्ही जेव्हा निवृत्त होता तेव्हा तुमच्याकडे काय शिल्लक राहते, यावर परताव्यावरील कराच्या बचतीचा मोठा परिणाम होत असतो.

आमच्या सन्माननीय वाचकांसाठी सुचना

अधिकाधिक गुंतवणूकदारांना त्यांच्या गुंतवणुकीतून जास्तीतजास्त परतावा मिळावा यासाठी आमच्या प्रामाणिक प्रयत्नांचा एक भाग म्हणून तुमच्यापैकी काही जणांना 'वेल्थवाईज' मोफत पाठविण्यात येत आहे. आम्हाला अशी प्रामाणिक अपेक्षा आहे की, तुम्हाला वेल्थवाईज मधला मजकूर आवडेल आणि कोणत्या ना कोणत्या मार्गाने तुम्हाला त्यापासून फायदा होईल. परंतु तुम्हाला जर नियमितपणे 'वेल्थवाईज' नको असेल, तर कृपया आम्हाला information@wiseinvestadvisors.com **वर ईमेल पाठवून तसे कळवावे. तुम्ही आम्हाला पेज ६ वर उल्लेख केलेल्या आमच्या कॉर्पोरेट कार्यालयाच्या पत्त्यावरही लिहून कळवू शकता.**

निवडक फंडचा परिणाम

ऑगस्ट ३०, २०१९ रोजी असलेल्या नोंदी

इक्विटी फंडस्

लार्ज कॅप, लार्ज & मिडकॅप, मल्टी कॅप

Fund	Launch	6 Mth*	1 Year*	2 Year**	3 Year**	5 Year**	7 Year**	10 Year**	15 Year**
ABSL Frontline Equity Fund	Aug-02	1.10	-8.00	0.45	5.08	8.17	14.08	11.88	17.61
ABSL Equity Fund	Aug-98	0.16	-9.82	-0.68	5.90	10.12	16.29	12.11	17.69
Axis Bluechip Fund	Jan-10	8.63	1.04	10.66	11.93	10.69	15.51	—	—
Axis Focused 25 Fund	Jun-12	6.80	-7.60	6.15	11.25	12.49	15.41	—	—
Franklin India Equity Fund	Sep-94	-3.86	-12.99	-1.14	3.17	8.35	13.74	12.24	17.11
HDFC Equity Fund	Jan-95	1.02	-6.58	2.84	7.64	7.28	14.06	12.41	18.05
HDFC Top 100 Fund	Oct-96	1.55	-5.10	3.73	7.96	7.50	13.30	11.33	17.77
HSBC Large Cap Equity Fund	Dec-02	6.35	-5.21	3.41	7.78	7.80	11.71	9.10	14.04
ICICI Prudential Bluechip Fund	May-08	1.64	-6.94	3.46	7.71	8.71	13.89	12.92	—
IDFC Core Equity Fund - Regular Plan	Aug-05	-1.90	-13.15	-2.12	5.07	7.93	11.46	8.70	—
Kotak Bluechip Fund - Regular Plan	Dec-98	2.93	-6.26	3.22	5.98	8.40	12.56	10.38	15.78
Kotak Standard Multicap Fund Regular	Sep-09	3.92	-4.81	3.29	8.50	12.04	16.88	—	—
L&T Equity Fund	May-05	1.51	-9.22	0.59	5.08	7.61	12.47	11.69	—
Mirae Asset Large Cap Fund - Regular	Apr-08	3.50	-3.43	5.15	10.23	11.81	17.19	15.39	—
Mirae Asset Emerging Bluechip Fund	Jul-10	4.87	-2.16	4.79	11.48	17.24	23.40	—	—
Motilal Oswal Multicap 35 Fund	Apr-14	3.99	-7.33	-1.94	8.05	15.13	—	—	—
Reliance Large Cap Fund	Aug-07	-2.56	-10.05	2.39	7.19	8.92	14.11	11.55	—
Reliance Multi Cap Fund	Mar-05	-4.16	-9.82	1.45	4.96	6.83	12.87	14.24	—
Invesco India Contra Fund	Apr-07	0.13	-11.00	4.86	9.03	11.26	17.02	13.29	—
SBI Bluechip Fund	Feb-06	4.38	-5.69	1.74	5.43	9.51	14.70	11.53	—
Principal Emerging Bluechip Fund	Nov-08	-1.17	-15.10	-2.41	5.37	12.21	19.26	15.39	—

मिडकॅप आणि स्मॉल कॅप

Axis Midcap Fund	Feb-11	1.95	-6.89	7.60	9.79	11.17	18.35	—	—
DSP Midcap Fund - Regular Plan	Nov-06	0.12	-9.81	-0.71	5.01	11.79	17.28	15.55	—
HDFC Mid-Cap Opportunities Fund	Jun-07	-2.86	-16.20	-3.43	2.99	10.01	17.10	17.05	—
Kotak Emerging Equity Scheme	Mar-07	-0.24	-10.72	-1.49	4.57	12.20	17.88	14.88	—
Franklin India Smaller Companies Fund	Jan-06	-6.33	-19.34	-7.97	-0.39	8.34	18.60	15.71	—
HSBC Small Cap Equity Fund	May-05	-5.43	-22.69	-10.77	-1.20	6.60	13.46	8.61	—
L&T India Value Fund	Jan-10	0.16	-12.51	-3.38	5.81	11.16	17.72	—	—
SBI Magnum Global Fund	Sep-94	-0.60	-9.81	2.23	4.11	8.91	15.93	14.58	19.53

सांप्रदायिक / विषयगत आणि कर बचत

ICICI Prudential Banking and Financial	Aug-08	4.11	-4.63	0.58	9.85	14.15	19.13	17.01	—
Reliance Banking Fund	May-03	1.46	-11.81	-1.21	8.03	11.06	15.67	14.95	19.85
Reliance Pharma Fund	Jun-04	-5.11	-12.67	7.05	-0.64	5.10	11.91	15.93	18.94
Canara Robeco Consumer Trends	Sep-09	3.29	-5.80	4.28	9.18	12.94	16.35	—	—
SBI Consumption Opportunities Fund	Jul-99	-4.06	-15.11	2.71	7.11	10.63	13.44	19.56	18.82
Tata India Consumer Fund - Regular	Dec-15	-2.86	-16.88	2.81	12.79	—	—	—	—
Axis Long Term Equity Fund	Dec-09	6.79	-4.69	7.45	9.86	11.93	18.94	—	—
HDFC Taxsaver Fund	Mar-96	-1.87	-11.81	-2.60	4.51	5.24	12.19	11.03	16.95
HSBC Tax Saver Equity Fund	Jan-07	2.47	-9.40	-1.78	5.30	7.55	13.43	11.37	—
IDFC Tax Advantage (ELSS) Fund	Dec-08	-2.24	-14.46	-2.22	6.32	9.18	14.93	13.01	—
Mirae Asset Tax Saver Fund - Regular	Dec-15	4.36	-2.95	6.05	12.93	—	—	—	—

हायब्रिड - आरबीट्राज

Funds	Launch	3 Mth*	6 Mth*	1 Year*	2 year**	3 Year**	5 Year**
ICICI Prudential Equity Arbitrage Fund	Dec-06	1.44	3.48	6.68	6.24	6.15	6.57
Invesco India Arbitrage Fund	Apr-07	1.49	3.42	6.33	6.08	5.97	6.47
Kotak Equity Arbitrage Fund Regular	Sep-05	1.46	3.51	6.79	6.38	6.29	6.67

हायब्रिड

Fund	Launch	6 Mth*	1 Year*	2 Year**	3 Year**	5 Year**	7 Year**	10 Year**	15 Year**
ABSL Equity Hybrid '95 Fund	Feb-95	0.03	-8.07	-1.12	3.78	8.34	12.79	11.49	15.51
Canara Robeco Equity Hybrid Fund	Feb-93	2.80	-1.58	4.26	7.40	9.73	13.28	12.28	16.32
HDFC Hybrid Equity Fund	Sep-00	2.59	-2.74	2.33	6.93	9.60	14.49	14.50	—
ICICI Prudential Balanced Advantage	Dec-06	3.55	2.62	5.19	6.99	8.72	—	—	—
ICICI Prudential Equity & Debt Fund	Nov-99	1.54	-3.86	2.90	6.88	9.44	14.62	13.63	14.84
Invesco India Dynamic Equity Fund	Oct-07	3.83	-2.90	1.29	6.57	8.10	—	—	—
Kotak Equity Hybrid Fund - Regular	Nov-99	5.34	-3.21	1.93	4.94	7.67	10.67	9.39	13.59
L&T Hybrid Equity Fund	Feb-11	2.81	-6.46	0.03	5.58	9.07	13.88	—	—
Principal Hybrid Equity Fund	Jan-00	-1.90	-8.75	1.89	7.84	9.40	13.38	10.64	13.05
Reliance Equity Hybrid Fund	Jun-05	-3.00	-12.52	-2.56	3.85	7.22	11.97	11.15	—
SBI Equity Hybrid Fund	Dec-95	5.79	1.20	6.32	8.20	10.32	15.27	11.91	16.22
HDFC Equity Savings Fund	Sep-04	2.27	0.63	3.37	6.71	7.56	—	—	—
IDFC Equity Savings Fund - Regular	Jun-08	2.07	-0.55	2.91	3.83	5.06	—	—	—
Kotak Equity Savings Fund - Regular	Oct-14	2.49	2.06	5.13	6.81	—	—	—	—
Reliance Equity Savings Fund	May-15	-2.56	-7.00	-0.70	3.45	—	—	—	—

* पूर्ण मोबदला - ** वार्षिक मोबदला. योजनेची पूर्वीची कामगिरी तिच्या भविष्यातील कामगिरीची निदर्शक नाही.

ऑगस्ट २०१९ मध्ये इक्विटी व इक्विटी ओरियंटेड फंडने घोषित केलेला निवडक फंडचा नफ्याचा हिस्सा

Scheme name	Date	Dividend declared in ₹ Per unit
ICICI Prudential Equity & Debt Fund - Dividend - Monthly	01/08/2019	0.20
Taurus Starshare (Multi Cap) Fund - Dividend	05/08/2019	0.50
UTI Equity Fund - Dividend	05/08/2019	2.66
Tata Hybrid Equity Fund - Regular Plan - Dividend - Monthly	05/08/2019	0.35
ICICI Prudential Infrastructure Fund - Dividend	08/08/2019	0.53
PGIM India Hybrid Equity Fund - Dividend - Monthly	19/08/2019	0.17
Kotak Equity Opportunities Fund - Dividend	23/08/2019	0.40
L&T Large and Midcap Fund - Dividend	23/08/2019	0.16
L&T Midcap Fund - Dividend	23/08/2019	2.88
Franklin India Focused Equity Fund - Dividend	26/08/2019	1.75
HSBC Regular Savings Plan - Dividend - Monthly	26/08/2019	0.05
L&T Conservative Hybrid Fund - Dividend - Monthly	26/08/2019	0.04
UTI Hybrid Equity Fund - Dividend	27/08/2019	0.19
Sundaram Select Focus - Dividend	27/08/2019	0.19
Sundaram Mid Cap Fund - Dividend	27/08/2019	0.15
Sundaram Small Cap Fund - Dividend	27/08/2019	0.22
Sundaram Rural and Consumption Fund - Dividend	27/08/2019	0.26
Sundaram Equity Hybrid Fund - Dividend	27/08/2019	0.11
DSP Equity & Bond Fund - Regular Plan - Dividend	28/08/2019	0.21

तुमच्या पोर्टफोलियोमध्ये या यादीत असणाऱ्या तुमच्या फंडसाठी तुम्हाला डिव्हिडन्ड (नफ्याचा हिस्सा) मिळाला आहे का ते बघा. जर तुमच्याकडे कोणतीही पोर्टफोलिओ नोंद नसेल तर वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायझर्स तुमच्यासाठी ते कोणत्याही मोबदल्याशिवाय करुन देतील. एकदा आमच्याकडे तपशिल आला की आम्ही तुम्हाला दर महिन्याला नोंदी पाठवू. या मोफत सेवेचा लाभ घेण्यासाठी आमच्या मुख्य कार्यालयाशी किंवा इतर कोणत्याही शाखेशी संपर्क साधा.

सिक्युरिटी गुंतवणुकीप्रमाणेच म्युच्युअल फंड, शेअर बाजार आणि इतर धोक्यांवर अवलंबून असते. कॅपिटलमार्केटवर परिणाम करणाऱ्या घटकांवर आणि प्रभावांवर एन ए व्हि (NAV) चे वर किंवा खाली जाणे अवलंबून असते.

Registered - R.N.I. No.: MAHMAR/2008/26837 • Postal Regd. No.: MCN/110/2018-2020 • Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, GPO, Mumbai on 12th & 13th of every month.
Date of publication: 8th of every month.

वेळ आली आहे, वित्तीय नियोजनाची कास धरण्याची

वित्तीय नियोजन म्हणजे फायनान्शियल प्लॅनिंग, ही तुमचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी पैशाचे माहितीयुक्त व्यवस्थापन करण्याची प्रक्रिया आहे. फायनान्शियल प्लॅनिंग उपलब्ध स्रोत, जबाबदाऱ्या, जोखीम क्षमता आणि जीवनशैली ह्याचा विचार करून वित्तीय उद्दिष्टे आणि वैयक्तिक प्राधान्यक्रम साध्य करण्यास मदत करते. जोखीम-लाभ संतुलन साधण्यासाठी वित्तीय योजनेत आपल्या बचतीचे नियतन विविध मालमत्तावर्गांमध्ये केले जाते.

तुम्हाला वित्तीय योजनेची गरज आहे का?

सर्व व्यक्तींना आणि कुटुंबांना, त्यांचे उत्पन्न किंवा वय काहीही असले तरी एका वित्तीय नियोजनाची गरज असते. त्यामुळे निवृत्तीसाठी, महाविद्यालयीन शिक्षणासाठी किंवा नव्या घरासाठी आपण पुरेशी बचत करीत आहोत की नाही ह्याची जाणीव त्यांना होते. आपल्याला वित्तीय योजना आपल्या पैशाची बचत करण्यासाठी आवश्यक असलेली शिस्त देते. एखादा अर्हताप्राप्त आणि अनुभवी वित्तीय नियोजक तुम्हाला तुमच्या गुंतवणुकींचे नियोजन करण्यास मदत करू शकतो जेणेकरून तुम्ही तुमच्या गुंतवणुकी विभिन्न मालमत्ता वर्गांमध्ये तसेच गुंतवणूक पर्यायांमध्ये विभाजित करून तुमच्या जोखीम पातळीत सर्वोत्तम उत्पन्न मिळवू शकता.

वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायझर्स हे सेबी नोंदणीकृत गुंतवणूक सल्लागार आहेत (नोंदणी क्र. INA000000664). आमच्या सल्लासेवा आणि कार्यकारी सेवांमध्ये अंतर राखण्यासाठी आम्ही इन्व्हेस्टमेंट ॲडव्हायझर डिपार्टमेंट (IAD) ह्या नावाने स्वतंत्र विभाग स्थापन केलेला आहे.

आम्ही तुम्हाला तुमची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी मदत करू शकतो. त्यासाठी आम्ही तुम्हाला सर्वमावेशक शुल्काधारित फायनान्शियल प्लॅनिंग पुरवितो आणि बहुतेकांच्या गरजा पूर्ण करू शकतील अशी वित्तीय उत्पादने सुचवतो. अनिश्चिततेवर मात करून तुम्ही तुमच्या पैशावर नियंत्रण मिळवून आपली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आत्मविश्वासाने पुढे जाण्यास तुम्हाला मदत करणे हे आमचे ध्येय आहे. काम किती गुंतागुंतीचे आहे ह्यावर शुल्क किती असेल ते ठरते.

ध्यानात असू द्या, फायनान्शियल प्लॅनिंग ही छाती दडपून टाकणारी प्रक्रिया असण्याची काही गरज नाही. आमच्याकडे असलेले अर्हताप्राप्त आणि अनुभवी सल्लागार फायनान्शियल प्लॅनिंग ही तुमच्यासाठी एक साधी आणि लाभदायी प्रक्रिया करतील.

आमची प्रक्रिया :

१. पहिली भेट आमच्यासाठी आणि तुमच्यासाठी एकमेकांची ओळख होण्याची एक संधी देते. आम्ही तुमच्या सर्व आवश्यकता पूर्ण करण्यास सक्षम आहोत की नाही हे ठरविण्याची एक संधीही तुम्हाला मिळते.

२. तुमची ध्येये आणि उद्दिष्टे तसेच तुमची सध्याची स्थिती स्पष्टपणे समजून घ्या. तुम्हाला तुमच्या संपत्तीने काय साध्य करायचे आहे ह्यावर आपण एक चर्चा करू.

३. चर्चा आणि एक सायकोमेट्रिक चाचणी ह्यांच्या साहाय्याने तुमची जोखीम रूपरेषा निश्चित करा. ह्यामुळे तुम्हाला तुमची ध्येये साध्य करण्यासाठी किती जोखीम घ्यायला हवी आणि किती जोखीम घेणे तुम्ही आवश्यक आहे हे आम्हाला शोधून काढता येईल.

४. तुमची अशी खास वित्तीय योजना म्हणजे फायनान्शियल प्लॅन विकसित करा. ह्यामध्ये तुमच्या गरजेनुरूप शिफारशीनुसार मालमत्ता नियतन आणि गुंतवणूक पर्यायांचा समावेश असेल. हे करताना आम्ही तुमच्या सध्याच्या गुंतवणुकींचेही विश्लेषण करू. आम्ही खास तुमच्या गरजेनुरूप बेतलेल्या फायनान्शियल प्लॅनची अंतिम आवृत्ती सादर करू म्हणजे तुम्ही आगेकूच करण्यास सज्ज असाल.

५. गुंतवणूक प्लॅनची अंमलबजावणी करा. फायनान्शियल प्लॅनमध्ये केलेल्या शिफारशी अंमलात आणण्यासाठी वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायझर्सचीच निवड करण्याचे तुमच्यावर बंधन नाही. मात्र तुमची तशी इच्छा असल्यास तुम्ही आमच्या कार्यकारी विभागाच्या सेवेचा लाभ शिफारशी अंमलात आणण्यासाठी घेऊ शकता.

६. तुमच्या परिस्थितीमधील तसेच बाजारांमधील, अर्थव्यवस्थेमधील आणि करांमधील बदल हाताळण्यासाठी आपण नियमितपणे आणि सक्रियपणे भेटू.

जर तुम्ही वित्तीय नियोजनाची प्रक्रिया सुरू करण्यास उत्सुक असाल तर तुम्ही आमच्या अंधेरी कार्यालयात इन्व्हेस्टमेंट ॲडव्हायझर्सशी संपर्क साधू शकता.

वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायझर्स प्रायव्हेट लिमिटेड

(CIN No.: U74140MH2003PTC142921)

मुख्य कार्यालय

अंधेरी : ६०२, सहावा मजला, श्रीकृष्ण कॉम्प्लेक्स, न्यु लिंक रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०० ०५३. **टेलिफोन :** २६७३ २६७१ / २६७३ २६७६.
इ-मेल : information@wiseinvestadvisors.com

शाखा

ठाणे : ५०२, पाचवा मजला, प्रतीभा बिल्डींग, तीन पेट्रोल पंप जवळ, पाचपाखाडी, ठाणे (पश्चिम) - ४०० ६०२. **टेलिफोन :** २५३७ १५६७ / २५३९ १३०६.
इ-मेल : information1@wiseinvestadvisors.com

www.wiseinvestadvisors.com

जाहीर निवेदन : प्रकाशनाच्या वेळी यातील सर्व माहिती चुकीची व खोटी नाही याची खात्री केलेली असून, त्याच्या अचूकतेबद्दल व पूर्णत्वाबद्दल आम्ही कोणतेही प्रतिनिधत्व करत नाही. वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायजर्स प्रायव्हेट लिमिटेड ला जबाबदार न धरता सर्व माहिती पुरविण्यात आलेली आहे.
धोके : म्युच्युअल फंड, जसे की सिक्युरिटी इन्व्हेस्टमेन्ट हे शेअर बाजार व इतर धोक्यांवर अवलंबून असतात आणि योजनेची उद्दिष्टे साध्य होतीलच असे खात्रीलायक सांगता येत नाही. सिक्युरिटीजमधील इतर गुंतवणुकीप्रमाणेच युनिटचे एन ए व्हि (**NAV**) वर किंवा खाली जाऊ शकते व ते कॅपिटल मार्केटवर परिणाम करणाऱ्या घटकांवर व प्रभावांवर अवलंबून असते. कृपया, गुंतवणूक करण्यापूर्वी ऑफर डॉक्युमेन्ट वाचा.

श्री. हेमन्त कुमार रुस्तगी यांनी ६०२, सहावा मजला, श्रीकृष्ण कॉम्प्लेक्स, न्यु लिंक रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०००५३ येथून, वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायजर्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्यासाठी संपादित, प्रकाशित केले आहे व ॲडव्हान्टएज ऑफसेट प्रिंटर्स, के-७ रिजवी पार्क, एस. व्ही. रोड, सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई ४०००५४ येथे छापले आहे .

Edited, Published and Printed by Mr. Hemant Kumar Rustagi, on behalf of **Wiseinvest Advisors Pvt. Ltd.** from 602, 6th Floor, Sri Krishna Complex, Opp. Laxmi Ind. Estate, New Link Road, Andheri West, Mumbai 400053 at **AdvantEdge Offset Printers,** K-7 Rizvi Park, S.V. Rd. , Santacruz (W), Mumbai 400 054. Design by **Mosaic Design.** Copyright reserved © 2007. All rights reserved in favour of Wiseinvest Advisors Pvt. Ltd.